# 'ई ॲण्ड टी सी'च्या ८५ विद्यार्थ्यांना नोकरीसंधी

प्रतिनिधी । नाशिक

अभियांत्रिकी शिक्षणातील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रथमच एकाच वेळी मोठ्या संख्येने नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. ई. ॲण्ड टी. सी. शाखेतील ८५ विद्यार्थ्यांना महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, रिलायन्स, प्राज, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, बॉश, इमर्सन, हिंदुजा टेक, फ्युचरन्सिया व अदानी ग्रुपमधील कंपन्यांत प्रॉडक्शन, मेंटेनन्स, डिझाइन या पदांवर प्लेसमेंट मिळाली आहे. तर आयटी क्षेत्रातील इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, हेक्सावेअर, कॅपजेमिनी, बिर्लासॉफ्ट, अटॉस यासारख्या अनेक नामवंत कंपन्यांचा समावेश आहे.

यामध्ये सर्वाधिक साडेसात लाखांचे तर सरासरी चार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज विद्यार्थ्यांना मिळाले आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील ४५ विद्यार्थ्यांना इमर्सन, हिंदुजा व प्राज या कंपन्यांत संधी मिळाली आहेत.

विद्यार्थ्यांना दिलेल्या ट्रेनिंग, मॉक इंटरव्ह्यू आणि ॲप्टिट्यूड ट्रेनिंगचा फायदा कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड होण्यासाठी झाला. ई. ॲण्ड टी.सी. आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेच्या विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात डाटा अनॉलिस्ट, प्रोजेक्ट इंजिनिअर, सिस्टिम्स इंजिनियर, असिस्टंट सिस्टिम्स इंजिनियर यासारख्या पदांसाठी निवड झाली आहे.



ई. ॲण्ड टी. सी. शाखेच्या ८५ विद्यार्थ्यांना आयटीसह महिंद्रा, रिलायन्स, अदानी ग्रुपमध्ये नोकरीची संधी मिळाली.

# के. के. वाघमध्ये 'सीईओ कनेक्ट' उपक्रम

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सीआयआय महाराष्ट्र राज्य परिषदेच्या इंडस्ट्री अकॅडमिक पॅनलतर्फे सीईओ कनेक्ट उपक्रमांतर्गत के. के. वाघ अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांना कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री अर्थात सीआयआय महाराष्ट्र राज्य परिषदेचे उपाध्यक्ष रॉबिन बॅनर्जी यांनी मार्गदर्शन केले.

यंदाचे हे सीईओ कनेक्टचे १३ वे सत्र होते. व्यासपीठावर सीआयआय पश्चिम महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष मनोज देशमुख, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. व्ही. एस. माने, डॉ. रवींद्र मुंजे, डॉ. पी. डी. जाधव आदी उपस्थित होते.

उद्योग-शिक्षण संस्था पॅनलचे सहनिमंत्रक तथा प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी मान्यवरांचे स्वागत करताना सीआयआय महाराष्ट्र परिषदेची माहिती दिली.

विद्यार्थ्यांकडून इंडस्ट्री लीडर्सच्या अपेक्षा जाणून घेऊन, त्या दृष्टीने इंडस्ट्री रेडी होण्यासाठी विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेण्याच्या प्रमुख हेतूने कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले.

पुढारी

## संक्षिप्त

### अभियांत्रिकीबाबत आज परिसंवाद

**नाशिक :** विद्यार्थी व पालकांना प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशप्रक्रियेची माहिती व्हावी, यासाठी मंगळवारी (दि.११) सायंकाळी ५ ते ८ या वेळेत के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने शंकराचार्य न्यासचे कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड येथे परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि महा-सीईटी सेल यांच्या परिपत्रकानुसार सर्व नियमावली, कागदपत्रांची पूर्तता, महाविद्यालयांचे पर्याय निवडणे, प्रवेश निश्चितीचे नियम इत्यादी बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच प्रवेशप्रक्रियेविषयीच्या सर्व शंकांचे निरसन केले जाणार असल्याचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता डॉ. डी. एम. चांदवडकर आणि समन्वयक डॉ. गणेश दाभाडे यांनी सांगितले.

My Nashik Edition
Oct 11, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

### वाघ अभियांत्रिकीतर्फे उद्या प्रवेश प्रक्रियेबाबत परिसंवाद

**नाशिक : प्रतिनिधी**

के.के.वाघ शिक्षण संस्था संचालित के.के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिकच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थी व पालकांना व्हावी यासाठी मंगळवार, दि. ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत परिसंवादाचे आयोजन शंकराचार्य न्यासचे कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे करण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यातील एकमेव स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून के के वाघ होय. अभियांत्रिकीची बी.टेक. पदवी बाबत विद्यार्थी व पालकांना प्रवेशासाठी कोणतीही अडचण येऊ नये या हेतूने परिसंवादाचे आयोजन केले आहे. आपल्या पाल्याचा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश सुकर व्हावा यासाठी सर्व आवश्यक माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व आपल्या शंकांचे निरसन करावे असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ. के.एन.नांदुरकर, अधिष्ठाता डॉ. डी.एम.चांदवडकर आणि समन्वयक डॉ.गणेश दाभाडे यांनी केले आहे.

# अभियांत्रिकी प्रवेशप्रक्रियेवर आज परिसंवाद, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## के. के. वाघ अभियांत्रिकी संस्थेतर्फे कुर्तकोटी सभागृहात आयोजन

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था नाशिकच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशप्रक्रियेची माहिती विद्यार्थी व पालकांना व्हावी यासाठी मंगळवारी (दि. ११) सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत परिसंवादाचे आयोजन शंकराचार्य न्यासचे कुर्तकोटी सभागृह, गंगापूररोड, नाशिक येथे करण्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यातील एकमेव स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून के. के. वाघ अभियांत्रिकी संस्था अभियांत्रिकीच्या बी. टेक. पदवीबाबत विद्यार्थी व पालकांना प्रवेशासाठी कोणतीही अडचण येऊ नये या हेतूने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि महा-सीईटी सेल यांच्या परिपत्रकानुसार सर्व नियमावली, कागदपत्रांची पूर्तता, महाविद्यालयांचे पर्याय निवडणे, प्रवेश निश्चितीचे नियम इत्यादी बाबींचे सविस्तर मार्गदर्शन या परिसंवादात केले जाईल. तसेच विद्यार्थी व पालकांच्या प्रवेशप्रक्रियेविषयीच्या सर्व शंकांचे निरसन केले जाणार आहे.

आपल्या पाल्याचा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश सुकर व्हावा यासाठी सर्व आवश्यक माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व आपल्या शंकांचे निरसन करावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता डॉ. डी. एम. चांदवडकर आणि कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गणेश दाभाडे यांनी केले आहे.

# आज प्रवेश प्रक्रियेबाबत परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १० : के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थी व पालकांना होण्यासाठी मंगळवारी (ता. ११) सायंकाळी ५ ते ८ या वेळेत परिसंवादाचे आयोजन गंगापूर रोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कुर्तकोटी सभागृह येथे करण्यात आले आहे. बी. टेक. पदवीबाबत विद्यार्थी व पालकांना प्रवेशासाठी कोणतीही अडचण येऊ नये, या हेतूने परिसंवादाचे आयोजन केले आहे. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि महा-सीईटी सेल यांच्या परिपत्रकानुसार सर्व नियमावली, कागदपत्रांची पूर्तता, महाविद्यालयांचे पर्याय निवडणे, प्रवेश निश्चितीचे नियम इत्यादी बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. तसेच विद्यार्थी व पालकांच्या प्रवेश प्रक्रियेविषयीच्या सर्व शंकांचे निरसन केले जाणार आहे. आपल्या पाल्याचा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश सुकर व्हावा यासाठी सर्व आवश्यक माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व आपल्या शंकांचे निरसन करावे,

# प्रथम वर्ष प्रवेश परिसंवादास प्रतिसाद

## वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थी, पालकांची हजेरी


**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १२ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेतर्फे समाजातील प्रत्येक घटकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण असे स्वप्न उराशी बाळगून ज्यांनी निरंतर पाठपुरावा करून [illegible] वतेची कास धरून संस्थेला स्वायत्त दर्जा मिळवून दिला. संस्थेचे [illegible] अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांच्या पावलावर पाऊल ठेवून संस्था विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्याच्या जडणघडणीसाठी विविध उपक्रम राबवून प्रगतीची एक एक शिखरे पादाक्रांत करीत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून संस्थेने विद्यार्थी व पालकांना प्रवेशासाठी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थी व पालकांना व्हावी यासाठी सायंकाळी परिसंवादाचे शंकराचार्य न्यासचे कुर्तकोटी सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी कै. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतींना उजाळा देत संस्थेच्या निरंतर प्रगतीचा इतिहास, संस्थेचा निकाल हा नेहमीच विद्यापीठाच्या निकालापेक्षा सरस, दरवर्षी विद्यार्थी विद्यापीठात पहिल्या तीन गुणानुक्रमात आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे कॅम्पस मधून उत्तम रोजगारासाठी निवड याचा लेखाजोखा विशद केला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने स्वायत्त दर्जा देताना या बाबींचा सर्वंकष केलेला विचार आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम व कौशल्य याचा संदर्भ विद्यार्थ्यांना उत्तम करिअर साठीचे महत्त्व स्पष्ट केले. या वेळी विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपक्रमाचे बहुसंख्य पालकांनी कौतुक केले. विद्यार्थी व पालकांनी शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज, विविध अभियांत्रिकी [illegible] महत्त्व, शाखा बदल, संवर्गासाठी कागदपत्रे, प्रवेश निश्चितीचे ठिकाण व शुल्क याबद्दल शंका विचारल्या त्याचे डॉ. डी. एम. चांदवडकर व सर्व विभागप्रमुखांनी निरसन केले. या वेळी उपप्राचार्य डॉ. एस. एस. साने, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एस. वाय. कुटे, अधिष्ठाता अंतर्गत गुणवत्ता डॉ. पी. डी. भामरे, उपस्थित होते. प्राचार्य नांदुरकर व अधिष्ठाता प्रवेश प्रक्रिया डॉ. चांदवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. गणेश दाभाडे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रा. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गणेश दाभाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

आपलं महानगर | my महानगर.com

# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे बुधवारी बाळासाहेब वाघ जयंती



नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचा जयंती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.१९) रोजी दुपारी ३ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानात कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात हे भुषवणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, भाजपचे राज्याचे उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्यासह खासदार हेमंत गोडसे, माजी खासदार समीर भुजबळ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार देवयानी फरांदे, आमदार दिलीप बनकर, आमदार सीमा हिरे, आमदार ॲड.राहुल ढिकले, आमदार माणिकराव कोकाटे, माजी आमदार अनिल कदम यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

AaplaMahanagar Edition
Oct 17, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

## वाघ शिक्षण संस्थेतर्फे १९ रोजी बाळासाहेब वाघ यांची जयंती

नाशिक : प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचा जयंती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी, १९ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानात कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात हे भुषवणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, भाजपचे राज्याचे उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्यासह खासदार हेमंत गोडसे, माजी खासदार समीर भुजबळ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार देवयानी फरांदे, आमदार दिलीप बनकर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले, आमदार माणिकराव कोकाटे, माजी आमदार अनिल कदम यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी नाशिककरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

पुढारी

# बाळासाहेब वाघ जयंतीनिमित्त कार्यक्रम

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या जयंतीनिमित्त के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १९) दुपारी ३ ला के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात भूषविणार आहेत. प्रमुख पाहूणे म्हणून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, भाजप राज्य उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह, खासदार हेमंत गोडसे, माजी खासदार समीर भुजबळ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, डॉ. सुधीर तांबे, प्रा. देवयानी फरांदे, दिलीप बनकर, सीमा हिरे, ॲड. राहुल ढिकले, ॲड. माणिक कोकाटे, माजी आमदार अनिल कदम आदी उपस्थित राहणार आहेत. नाशिककरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अजिंक्य वाघ व समीर वाघ यांच्यासह आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

My Nashik Edition
Oct 17, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

जयंती निमित्त...
कोटी-कोटी प्रणाम!



कै. बाळासाहेब देवराम वाघ

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
स्माईल व स्पिनॅच संस्था
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

प्रेरणास्थान



कै. देवराम सयाजी वाघ

## कै. बाळासाहेब देवराम वाघ

# जयंती सोहळा

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाचे या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टा ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मुल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणाऱ्या उत्तुंग व्यक्तीमत्वाचा जयंती कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे.
या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा.श्री. बाळासाहेब थोरात**
(माजी महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

प्रमुख पाहुणे

**मा.श्री. राजेशजी टोपे**
(माजी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य)

**मा.श्री. कृपाशंकर सिंह**
(उपाध्यक्ष, भाजप, महाराष्ट्र राज्य)

**मा.श्री. हेमंत गोडसे** (खासदार, नाशिक लोकसभा)
**मा.श्रीमती निलीमाताई पवार** (मा. सरचिटणीस, म.वि.प्र.)
**मा.डॉ. राहुल आहेर** (आमदार)
**मा.सौ. देवयानी फरांदे** (आमदार)
**मा.श्री. दिलीपराव बनकर** (आमदार)
**मा.सौ. सीमा हिरे** (आमदार)
**मा.श्री. अनिल कदम** (मा.आमदार)
**मा.ॲड. राहुल ढिकले** (आमदार)
**मा.डॉ. सुधीर तांबे** (आमदार)
**मा.श्री. समीर भुजबळ** (मा.खासदार)
**मा.ॲड. माणिकराव कोकाटे** (आमदार)

आपले विनित

**श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)


- **वेळ** : बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२, दुपारी ३.०० वाजता
- **स्थळ** : के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३.

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools

# मी पाहिलेले बाळासाहेब वाघ

निमित्त..!

डॉ. दि. मा. मोरे, पुणे



# बाळासाहेब वाघ : मद-मोह वर्जित व्यक्तीमत्व

**के. के. वाघ शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा स्व. बाळासाहेब वाघ यांच्या जयंतीनिमित्त डॉ. माधवराव चितळे यांनी जागविलेल्या आठवणी....**



९० वर्षांच्या आयुष्यात आदरणीय भाऊ अर्थात बाळासाहेब वाघ यांनी अनेक सुहृद आयुष्याशी जोडले. त्यातीलच मी एक. माझ्या आयुष्यातील जवळपास पन्नास वर्षे मी नाशिक जिल्ह्यात घालवली. त्यामुळे भाऊ मला जवळून बघायला मिळाले. त्यांनी शिक्षणसंस्थेत विविध क्षेत्रातील नामवंतांचा समावेश करुन घेतला. भाऊंनी कृषीच्या जोडीला कृषि अभियांत्रिकी, जैवतंत्रविज्ञान इ. अशा विविध क्षेत्रातही रस घेतला. महाविद्यालयाच्या भव्य-दिव्य व प्रशस्त इमारतीमध्ये संचालकांची खोलीसुध्दा स्वतःच्या घरातील खोलीसारखीच साधीसुधी ठेवण्याची काळजी त्यांनी घेतली होती. 'साधी राहणी आणि उच्च विचार सरणी' हा विचार काही लोकांच्यादृष्टीने फक्त इतरांना उपदेशासाठी असतो.

भाऊंनी कोणतेही काम हाती घेतले की, त्याचा काटेकोर तपशील ठरविण्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. काकासाहेब हे स्वतः कर्मवीर असल्यामुळे त्यांचा वारसा अधिक प्रभावीपणे चालविणाऱ्या बाळासाहेबांना 'कर्मधुरंधर' म्हणता येईल, असे वाटते. एवढी मोठी शिक्षण संस्था, तिच्या विविध शाखा आणि स्वयंचलित विद्यापीठ उभे करण्याची ताकद असलेल्या माणसाला खरे तर राजकारणाचा मोह हवा होता. अनेक आधुनिक शिक्षण महर्षींप्रमाणे त्यांनाही सहज आमदार नामदार होता आले असते. पण भाऊंना जसा मी पणाचा गर्व नव्हता तसा मोठेपणाच्या व्यावहारिक जगताचाही अजिबात मोह नव्हता. भाऊंनी अनेक माणसे उभी केली, सामान्य कार्यकर्त्यांना मोठेपण मिळवून दिले पण स्वतः मात्र 'पुढारी'' होण्याचे नाकारले. भाऊंची जीवनरचना शिस्तबध्द होती. आहारविहार नियमित होता. कमालीचा काटकपणा भाऊंच्या अंगी रूळलेला होता. परिश्रमापासून कधीही मागे न हटण्याची विजिगिषूवृत्ती भाऊंच्या ठायी होती.

पसायदानातील 'चंद्रमे जे अलांच्छन' असे म्हणतानाच 'मार्तंड जे तापहीन' असेही त्यांच्यासाठी म्हणावेसे वाटते. भाऊंसारखा सामाजिक नेता प्रखरतेने सूर्याप्रमाणे सर्वत्र प्रकाश फैलावत राहिला तरी आपल्या उष्णतेने त्याने लोकांना त्राही करून सोडले नाही, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

टीप:- प्रस्तुत लेख सारांश हा 'कर्मधुरंधर बाळासाहेब वाघः कार्य आणि कर्तुत्व' या गौरव ग्रंथातून घेण्यात आलेला आहे.

# सुहृदयी व्यक्तिमत्त्व बाळासाहेब वाघ

**९० वर्षांच्या आयुष्यात आदरणीय भाऊंनी विविध क्षेत्रांतील अनेक सुहृदय स्वतःच्या आयुष्याशी जोडले. त्यातील एक म्हणजे मी. स्वतःच्या निवडक जीवलग मित्रांपैकी भाऊंना मी एक मानतो. आमची ओळख जलसिंचन आयोगाच्या निमित्ताने झाली.**

[illegible]



## जयंती

**डॉ. माधवराव चितळे**
औरंगाबाद

[illegible]

# कर्मधुरंधर बाळासाहेब वाघ

**बाळासाहेब वाघ यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील मेंढी (ता. सिन्नर) या छोट्याशा गावी आपल्या आजोळी १९ ऑक्टोबर १९३२ ला देवराम उर्फ कर्मवीर काकासाहेब व गीताई वाघ या दाम्पत्याच्या पोटी झाला. तर वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाले. बाळासाहेब वाघ अतिशय निरोगी व समृद्ध आयुष्य जगले. त्यांनी आपले वडील देवराम तथा पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालविला. काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. सन २००६ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष तर २००६ पासून अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे संस्थेची धुरा सांभाळली.**

त्यांचे तीन गुण महत्त्वाचे वाटतात. पहिला [illegible]

## जयंती

**डॉ. सविता जी. सावंत**
[illegible]

[illegible]

# भाऊंचे जीवन म्हणजे आदर्श वस्तुपाठ..!



# व्रतस्थ मार्गदर्शक, शिक्षणमहर्षी बाळासाहेब वाघ



## आज बाळासाहेब वाघ जयंती सोहळा


के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, स्माईल व स्पिरॅच संस्था यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

जयंती निमित्त... कोटी-कोटी प्रणाम!



जयंती सोहळा

कै. बाळासाहेब देवराम वाघ

◦ कार्यक्रमाचे अध्यक्ष ◦

◦ प्रमुख पाहुणे ◦

◦ आपले विनित ◦

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools

॥ जयंती सोहळा ॥



मा. स्व. बाळासाहेब वाघ

जयंती सोहळ्यास कोटी-कोटी प्रणाम...!



डी. के. नाना जगताप

सौ. सुवर्णाताई जगताप

टिप : कै. बाळासाहेब वाघ यांचा जयंती सोहळा १९/१०/२०२२ ला के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय नाशिक येथे दुपारी ३ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

प्रेरणास्थान



कै. देवराम सयाजी वाघ

## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
## स्माईल व स्पिनॅच संस्था
## यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

जयंती निमित्त... कोटी–कोटी प्रणाम!



# जयंती सोहळा

## कै. बाळासाहेब देवराम वाघ

के.के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टा ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मुल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणाऱ्या उत्तुंग व्यक्तीमत्वाचा जयंती कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा.श्री. बाळासाहेब थोरात**
(माजी महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

प्रमुख पाहुणे

**मा.श्री. राजेशजी टोपे**
(माजी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य)

**मा.श्री. कृपाशंकर सिंह**
(उपाध्यक्ष, भाजप, महाराष्ट्र राज्य)

मा.श्री. हेमंत गोडसे (खासदार, नाशिक लोकसभा)
मा.श्रीमती निलीमाताई पवार (मा. सरचिटणीस, म.वि.प्र.)
मा.डॉ. राहुल आहेर (आमदार)
मा.सौ. देवयानी फरांदे (आमदार)
मा.श्री. दिलीपराव बनकर (आमदार)
मा.सौ. सीमा हिरे (आमदार)
मा.श्री. अनिल कदम (मा.आमदार)
मा.ॲड. राहुल ढिकले (आमदार)
मा.डॉ. सुधीर तांबे (आमदार)
मा.श्री. समीर भुजबळ (मा.खासदार)
मा.ॲड. माणिकराव कोकाटे (आमदार)

आपले विनित

**श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- वेळ : बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२, दुपारी ३.०० वाजता
- स्थळ : के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक–४२२००३.

**Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools**

# माझे कर्मयोगी मामा : कै. बाळासाहेब वाघ

स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुलामगिरीविरुद्ध निर्भयपणे बंडाचे निशाण खांद्यावर मिरवणाऱ्या काकासाहेबांच्या घरात रोज घडणाऱ्या स्थित्यंतराचा परिणाम सर्वात जास्त त्यांच्या कुटुंबावर होत होता. या घराला, त्यात राहणाऱ्या प्रत्येकाला रोज नवनवीन संकटांना सामोरे जावे लागत होते. काकासाहेबांच्या कारकीर्दीत अशोकस्तंभाजवळील हनुमान घाटावर असलेला 'वाघ बंगला' म्हणजे या चळवळीचे एक प्रमुख केंद्र होते. कर्मधुरंधर बाळासाहेब वाघ यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त त्यांच्या कर्मकर्तृत्वाचा हा वृत्तांत...

नानाविध क्षेत्रांतील भाऊराव पाटील, मधू लिमये, केशवराव जेधे, नानासाहेब पाटील, रावसाहेब थोरात या मान्यवरांचा कायमच राबता घरात असायचा. मामा हे तेथील स्वयंस्फूर्त स्वयंसेवकच होते. प्रत्यक्ष अनुभव व मिळालेल्या सहवासामुळे हे घर सुसंस्कृत झाले. त्यात भाऊमामांची निरीक्षण व आकलनशक्ती इतकी अफाट होती की, त्यांनी अनेक चांगले संस्कार घेतले. एकदा तर भाऊराव पाटील तेथे आठ दिवस मुक्कामी होते,



तेव्हा साहजिकच त्यांची सर्व कामे भाऊमामांनी केली होती. काकासाहेब भूमिगत झाले अन् कळत-नकळत लहानपणापासूनच भाऊमामांना वडिलकीची भूमिका निभावावी लागली, ती कायमचीच. काकांची वैचारिक श्रीमंती व काईंची स्थितप्रज्ञता हे दोन्ही संस्कार मामांमध्ये सारखेच वाढीला लागले आणि तो आलेख जीवनभर वाढतच राहिला.

एक ध्येयवेडा माणूस म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत आलो. सध्या हयात असलेल्या सर्व सामाजिक व्यक्तिमत्त्वांमध्ये मी आदर्शाची जागा माझ्या भाऊमामांनाच देतो. त्यांना वाचनाची खूप आवड होती. मामांची राहणी इतकी साधी होती की, 'एक होता कार्व्हर' या पुस्तकातील कार्व्हरची तीव्रतेने आठवण व्हायची.

मामा खरे तर बी.एस्सी. डिग्री घेतलेले पण त्यांचा पिंड शेतकऱ्याचा होता. मामांनी के. के. वाघ शिक्षण संस्थेत खूप झाडे लावली. वारशाने आलेले कृषिशास्त्र, निसर्गविद आणि बांधकामशास्त्र त्यांच्या नसानसांतच होते. कर्मवीर काकासाहेब वाघ इंजिनिअरिंग कॉलेजवर कधीही जा, जिथे बांधकाम सुरू असेल, तिथेच मामा सापडतील. मामांना एकच व्यसन होते, ते म्हणजे जे काम हातात घेतले ते जिद्दीने, काटकसरीने पूर्ण करण्याचे. मामांचे लग्न आळंदी या तीर्थक्षेत्री झाले. मामांनी स्वतः साठीही बऱ्याच मुली पाहिल्या. पण त्यांच्या पसंतीला कोणी सहजासहजी उतरेना. शेवटी मामांनी चौकसपणे शकूमामींची निवड केली. साधेपणाने त्यांच्याशी लग्न केले होते. जयंतीनिमित्ताने, भाऊमामांची मते, मुलाखत आणि लघुपट यातून लोकांपर्यंत पोहोचवल्यास ते भावी पिढीला नक्कीच मार्गदर्शक, दिशादर्शक ठरणार आहे. अशा या मामांनी वयाची शंभरी गाठावी, अशी इच्छा होती पण नियतीने ती इच्छा अपूर्णच ठेवली. अशा या कर्मयोग्याला माझे लाख लाख वंदन..!

- नीलिमाताई पवार,
माजी सरचिटणीस, म.वि.प्र. समाज, नाशिक

# देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे
# कर्मधुरंधर कै.बाळासाहेब वाघ उर्फ भाऊ

नाशिक । बाळासाहेब वाघ यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील मेंढी (ता.सिन्नर) या छोट्याशा गावी आपल्या आजोळी १९ ऑक्टोबर १९३२ ला देवराम उर्फ कर्मवीर काकासाहेब व गीताई वाघ या दाम्पत्याच्या पोटी झाला. ९० वर्षांच्या आयुष्यात भाऊंनी निर्मळ चारित्र्य, उत्तम लोकसंग्रह आणि लोकहितास प्राधान्य देण्याची वृत्ती हे तीन गुण त्यांनी जोपासल्यामुळे भाऊ इतरांपेक्षा वेगळे ठरले.

बाळासाहेब वाघ अतिशय निरोगी व समृद्ध आयुष्य जगले. वडीलांपश्चात त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, सहकार व शैक्षणिक वारसा समर्थपणे पुढे चालवला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने सन १९७० साली के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. २००६ पर्यंत संस्थेचे उपाध्यक्ष तर २००६ पासून अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्ष संस्थेची धुरा सांभाळली. त्यांचे तीन गुण महत्वाचे वाटतात. पहिला म्हणजे निर्मळ चारित्र्य. दुसरा गुण म्हणजे उत्तम लोकसंग्रह! याच लोकसंग्रहाच्या बळावर त्यांनी निफाड-रानवड कारखाने व के. के. वाघ शिक्षण संस्था उत्तम चालवली आहे. तिसरा गुण म्हणजे प्रसिद्धी प्रमुख राहून लोकहितास प्राधान्य देण्याची वृत्ती! या तीन



गुणांमुळे बाळासाहेब इतरांपेक्षा वेगळे ठरले होते.

१९७० साली केवळ एका शाळेपासून स्थापन केलेली शिक्षण संस्था आज एका विशाल वटवृक्षात रुपांतरीत झाली आहे. ग्रामीण भागातील बहुजनास समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना शिक्षणाच्या उत्तम संधी निर्माण करुन देणे हा उद्दात हेतू समोर ठेऊन उच्च नैतिक मुल्यांची जोपासना केली. उत्कृष्ट व परिपूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाची ज्ञानगंगा ग्रामीण भागात पोहोचावी व ग्रामीण भागातील मुले आणि मुली यांना गावातच शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्या, या दृष्टीकोनातून काकासाहेब नगर, रानवड, भाऊसाहेब नगर व चांदोरी येथे वरिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली. ग्रामीण भागातील मुले व मुली शिक्षणाची ज्ञानरुपी फळांचा आस्वाद घेत आहेत. यामध्ये भाऊंचे मोलाचे योगदान आहे. शिक्षण हाच धर्म असे मानणाऱ्यांपैकी बाळासाहेब वाघ आहेत. परंतु, वाचन हे ज्ञानाचे अजोड साधन आहे. हे जाणून त्यांनी निफाड तालुक्यातील गावागावातून ७० वाचनालये स्थापन केली आहेत. ग्रामीण भागातील वाचनालयाची गरज पूर्ण केली. तसेच बालमुक्तांगण व मेडिकल ट्रस्टही स्थापन केल्या.

भाऊ आतापर्यंतच्या आयुष्यात सतत इतरांना काही ना काही देत राहिले, आजही देतच आहेत. काहींना मात्र त्यांची दूरदृष्टी, कामाची पद्धत न समजल्याने ते नाराजही झालेत. सत्ता, पैसा, प्रतिष्ठा जपणारा हा काळ आहे आणि या काळात एकाच वेळी सगळ्यांना १०० टक्के समाधानी, संतुष्ट ठेवणे अशक्यच होते. तेच भाऊंच्या बाबतीतही घडले भाऊंसमोर यावेळी दोन मार्ग होते. बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणे बदलून स्वतःचा फायदा करुन घेणे आणि दुसरा मार्ग होता, व्रतस्थपणे आत्तापर्यंत स्वीकारलेल्या, आचरलेल्या मार्गाने मार्गक्रमण करणे. भाऊ आणि त्यांचे सहकारी यांनी दुसरा मार्ग स्वीकारला. निःस्वार्थपणे,तत्वांना मुरड न घालता जे करणे शक्य आहे ते त्यांनी केले.

– डॉ. सविता सावंत, उपप्राचार्य,
के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय
चांदोरी

# ओला दुष्काळ जाहीर करा

## बाळासाहेब थोरात यांची राज्य सरकारकडे मागणी

म. टा. विशेष प्रतिनिधी, नाशिक

सतीश काळे



शिवसेना नेते भास्कर जाधव यांच्या घरावर हल्ला होणे ही दुर्दैवी बाब असून, गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेले राजकारण महाराष्ट्राला रुचणारे नसल्याचा टोला काँग्रेसचे नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी लगावला. सतत सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची दिवाळी खराब झाली असून, राज्य सरकारने तत्काळ ओला दुष्काळ जाहीर केला पाहिजे. परंतु, पंचनामे होत नसल्याने शेतकऱ्यांना भरपाई कुठून मिळणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. भाजप नेत्यांचे चांगले फोटो छापले नाहीत म्हणून शंभर रुपयांचे रेशन किट देण्यास उशीर होत असल्याची टीकाही त्यांनी केली.

नाशिक दौऱ्यावर आलेल्या थोरात यांनी शिवसेना नेते व माजी मंत्री भास्कर जाधव यांच्या घरावर झालेल्या हल्ल्यानंतर सत्ताधाऱ्यांवर टीका केली. राज्यात तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणीही त्यांनी केली. सतत सुरू असलेल्या पावसामुळे पिके वाया गेली आहेत. त्यामुळे तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा, ही आमची मागणी आहे. परंतु, सरकारकडून केवळ पंचनामे करण्याच्या घोषणा केल्या जात असून, तेदेखील काम होत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कुठून मिळणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शंभर रुपयांच्या रेशन किटवर भाजप नेत्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे फोटो लावण्यात आले आहेत. परंतु, लावलेले फोटो गंभीर असल्यामुळे किट वितरीत केले नाहीत. किमान दिवाळीत हे किट मिळणे अपेक्षित होते, असे सांगत सध्याचे सरकार टेन्शनमध्ये असल्याची टीकाही त्यांनी केली.

### 'खर्गे अनुभवी नेते'

मल्लिकार्जुन खर्गे हे काँग्रेसचे अध्यक्ष झाले असून, त्यांचा अनुभव मोठा आहे. गेल्या ५० वर्षांपासून ते संसदीय कामकाजात आहेत. केंद्रीय मंत्री आणि विरोधी पक्षनेते म्हणूनही त्यांनी काम केले आहे. त्यामुळे एक अनुभवी नेता काँग्रेसला लाभला असून, येणाऱ्या २०२४ निवडणुकीत काँग्रेस पक्षाला चांगले यश येईल, असा दावा थोरात यांनी केला आहे. सोनिया गांधी यांनी कठीण काळात पक्ष सांभाळला असून, खर्गे यांनाही त्या मार्गदर्शन करतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सकाळ

# पुरोगामी विचारांचे भाऊ 'कर्मयोगी'

## थोरात : बाळासाहेब वाघ जयंती सोहळ्यात मान्यवरांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा



नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात 'कृषी क्रांतीचे योगीराज' या पुस्तकाचे प्रकाशन करताना माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री राजेश टोपे, भाजपचे उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह, नीलिमा पवार, आमदार डॉ. सुधीर तांबे, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, आमदार सीमा हिरे, आमदार दिलीप बनकर, अनिल कदम आदी.

नाशिक, ता. १९ : कर्मवीर काकासाहेब वाघ यांचे विचार पुढे नेणारा (स्व.) बाळासाहेब वाघ यांनी सामाजिक, पुरोगामी चळवळीला बळ देत वाहून समाजाला कलाकारी दिली. आयुष्यातील प्रत्येक दिवस त्यांनी कामासाठी दिला. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक समस्या सोडविण्यात त्यांचे अतुलनीय योगदान राहिले. जलसंधारण, शेती, सहकार अशा विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या भाऊंना कर्मयोगी म्हटले पाहिजे, असे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी बुधवारी (ता. १९) केले.

पंचवटीतील अमृतधाम येथील के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या प्रांगणात के. के. वाघ शिक्षण संस्था आणि स्माइल व सिनेर्जी संस्था यांच्यातर्फे आयोजित (स्व.) बाळासाहेब वाघ जयंती सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माइल आणि सिनेर्जी संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, शकुंतलाताई वाघ, संस्थेच्या माजी सचिव नीलिमाताई पवार, आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. राहुल आहेर, सीमा हिरे, दिलीप बनकर, माजी आमदार अनिल कदम आदी या प्रसंगी उपस्थित होते.

श्री. थोरात म्हणाले, की बाळासाहेब वाघ यांचे व्यक्तिमत्त्व हे दीपस्तंभाप्रमाणे होते. त्यांनी शिक्षण क्षेत्रात भाऊंचे मोठे काम शैक्षणिक संस्था, असोसिएशनच्या माध्यमातून उभे राहिले.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविकात पुरस्कारांसंदर्भात माहिती दिली. बाळासाहेब वाघ यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट इन्स्टिट्यूट, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक आणि जीवनगौरव असे चार पुरस्कार दिले जातील. त्यासाठी समिती गठित केली असून, प्राप्त प्रस्तावांची छाननी करून पुरस्कारार्थींच्या नावाची घोषणा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्वाती पवार व प्रा. जागृती निकम यांनी सूत्रसंचालन तर अजिंक्य वाघ यांनी आभार मानले.

### अधिकाऱ्यांचा अभ्यास करावा लागायचा

श्री. थोरात म्हणाले, की शैक्षणिक क्षेत्राशी निगडित प्रश्नांबाबत विधिमंडळात ते विभागाच्या मंत्र्यांशी चर्चा करायचे. बाळासाहेब वाघ यांच्याशी बैठक असेल त्याच्या आधीच्या दिवशी अधिकाऱ्यांनादेखील संबंधित प्रश्नावर अभ्यास करावा लागत असे. प्रश्न कसे मांडावे व सोडवून घ्यावे ही कला भाऊंकडे होती.

### कार्यक्रमाची क्षणचित्रे...

- संस्थागीताने झाले सिलेक्शन
- व्हिडिओतून भाऊंच्या कार्याचा घेतला आढावा
- कामगारमंत्री दादा भुसे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा व्हिडिओतून कार्यक्रमाला शुभेच्छा.
- डॉ. शंकरराव मगर लिखित कृषीक्रांतीचे योगीराज पुस्तकाचे प्रकाशन
- ज्ञानेश्वर लेखन शुद्ध कसे करावे या पुस्तकाचेही झाले प्रकाशन

### भाऊंचा वारसा पुढे न्यावा : टोपे

गेल्या वर्षी बाळासाहेब वाघ यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शैक्षणिक प्रांगणात असलो होतो. आज ते आपल्यात नाहीत परंतु त्यांचे अस्तित्व या संस्थेत कामकाजातून जाणवत राहील. नैतिकता, त्यागवृत्ती, सालसपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सामर्थ्य होते. कार्यक्षेत्री असलेला सर्वांगीण त्यांच्याकडून शिकण्यासारखा होता. भाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेताना, समाज घडविण्यासाठी त्यांचे सामर्थ्यतेशी विचार प्रत्येकाने अंगीकारावे, असे आवाहन श्री. टोपे यांनी केले.

### बाळासाहेब वाघ विद्यापीठाची स्थापना व्हावी : सिंह

अत्यंत प्रभावशाली व प्रेरणादायी व्यक्ती म्हणून बाळासाहेब वाघ यांची ओळख होती. त्यांच्या नावाने नाशिकमध्ये बाळासाहेब वाघ विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे, अशी अपेक्षा कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केली. विद्यापीठ स्थापनेसाठी सर्वोत्परी मदत, सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शविली.

Nashik Main
20/10/2022 Page No. 2

# बाळासाहेब वाघ विद्यापीठ उभे करा

## कृपाशंकर सिंह यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

बाळासाहेब वाघ यांचे कार्य लक्षात घेत नाशिकमध्ये केवळ शिक्षण संस्था म्हणून मर्यादित न राहता बाळासाहेब वाघ यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करावे, असे प्रतिपादन भाजपाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांनी केले. बाळासाहेब वाघ यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले की, शिक्षणाचा ध्यास घेऊन काम करणाऱ्या बाळासाहेब वाघ यांचे काम स्मरणात ठेवून पुढे वाटचाल केल्यास हे कार्य अधिक व्यापक होईल. माजी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री असताना बाळासाहेब वाघ यांच्यासोबतच्या झालेल्या भेटींच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी ते म्हणाले की, शिक्षण संस्था आज जागोजागी आहेत, पण त्याचा दर्जा राखण्याचे काम के. के. वाघ शिक्षण संस्थेसारख्या खूप कमी संस्थांनी केले आहे. हा दर्जा ती संस्था चालविणाऱ्या व्यक्तीमधून येतो. अचूक माणसे निवडून, त्यांच्याकडून योग्य ते काम करून घेण्याचे कौशल्य भाऊंमध्ये



होते. हा जयंती सोहळा म्हणजे त्यांच्या कार्याचा गौरव आहे. अध्यक्षस्थानी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात होते. ते म्हणाले की, कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या विचारांचा आणि कार्याचा वसा पुढे चालविणाऱ्या बाळासाहेब वाघ यांना कर्मयोगी म्हणायला हवे. राज्यात ४५० विनाअनुदानित इंजिनीअरिंग महाविद्यालये आहेत. परंतु, त्यांच्या नेतृत्वाची वेळ आली की सर्वांची पसंती भाऊंना मिळे. दरवर्षी हा दिवस विविध शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या व्याख्यानाने साजरा करावा, असेही थोरात यावेळी म्हणाले.

यावेळी कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर लिखित 'कृषी क्रांतीचे योगिराज' व व. ना. कुंभार लिखित 'अशुद्ध लेखन शुद्ध कसे करावे', या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. आमदार डॉ. राहुल आहेर, अनिल कदम, डॉ. सुधीर तांबे, दिलीप बनकर, सीमा हिरे यांनी बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन स्वाती पवार व प्रा. जागृती निकम यांनी केले, तर आभार अजिंक्य वाघ यांनी मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, खासदार हेमंत गोडसे, समीर भुजबळ, नीलिमा पवार यांसह मान्यवर उपस्थित होते.

### भैय्या आला अन् मराठी बोलून गेला!

मराठी ही केवळ भाषा नव्हे, तर महाराष्ट्राची संस्कृती आहे. मला मराठी भाषेबाबतही तितकेच प्रेम आहे, जितके हिंदीबाबत आहे, असे मराठीत बोलत कृपाशंकरसिंह यांनी संवाद साधला. हे काही मी वरवर बोलत नाही, तर अगदी मनापासून बोलतो आहे. नाहीतर तुम्ही म्हणाल 'भैय्या नाशिकमध्ये आला आणि मराठी बोलून गेला', ...हे त्यांचे वाक्य ऐकताच उपस्थितांमध्ये हशा पिकला.

लोकमत

# बाळासाहेब वाघ यांचे कार्य दीपस्तंभासारखे : थोरात

## जयंती सोहळा : लोकप्रतिनिधींनी दिला आठवणींना उजाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष दिवंगत बाळासाहेब वाघ यांचे कार्य दीपस्तंभासारखे असून, त्यांनी पुरोगामी विचारांचे काकासाहेब वाघ यांच्या विचारांचे तंतोतंत अनुकरण करून शिक्षण व सामाजिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिल्याचे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. त्याचप्रमाणे बाळासाहेब वाघ यांच्या कार्याचा गौरव करतानाच त्यांना कर्मयोगी अशी उपाधीही देत त्यांच्याविषयीच्या भावना बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केल्या.

के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच संस्था यांच्यातर्फे संयुक्तरीत्या बाळासाहेब वाघ (भाऊ) यांचा जयंती सोहळा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेत उत्साहात साजरा करण्यात आला. व्यासपीठावर माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, कृपाशंकर सिंह, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, नीलिमाताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, डॉ. सुधीर तांबे, दिलीप बनकर, सीमा हिरे, अनिल कदम, प्रा. के. एस. बंदी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात बाळासाहेब वाघ यांचे योगदान अतुलनीय असून, विविध शैक्षणिक शाखांचे प्रश्न सोडविण्यातही भाऊंचा वाटा मोठा असल्याचे थोरात यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला. दरम्यान, डॉ. शंकरराव मगर लिखित कृषी क्रांतीचे योगिराज व ब.ना. कुंभार गुरुजी लिखित अशुद्ध लेखन शुद्ध कसे करावे, या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्वाती पवार व प्रा. जाग्रती निकम यांनी केले.




पुढच्या पिढीने बाळासाहेब वाघ यांच्या विचारांचा वारसा चालवला पाहिजे, हीच खरी भाऊंना आदरांजली होईल. सध्या शिक्षणात गुणवत्ता टिकवून ठेवणे मोठे आव्हान आहे. हे आव्हान के. के. वाघ शिक्षण संस्थेने बाळासाहेब वाघ यांच्या मार्गदर्शनाने लीलया पेलले आहे. भाऊ शेवटपर्यंत माणसे जोडत गेले. त्यांचा हाच विचार घेऊन शैक्षणिक क्षेत्रातील पुढील वाटचाल करण्याची गरज आहे.

**- राजेश टोपे,** माजी आरोग्यमंत्री

## बाळासाहेब वाघ नावाने विद्यापीठ व्हावे : कृपाशंकर सिंह

बाळासाहेब वाघ यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यातून पुढील पिढीला नियमित प्रेरणा मिळत राहावी यासाठी नाशिकमध्ये के. के. वाघ शिक्षण संस्थेने बाळासाहेब वाघ यांच्या नावे विद्यापीठ सुरू करावे, अशी भावना कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केली. त्यासाठी भविष्यात संस्थेला राज्यस्तरावर अथवा केंद्र स्तरावर आवश्यक ती मदत करण्याची तयारीही कृपाशंकर सिंह यांनी यावेळी दर्शविली.

# बाळासाहेब वाघांचे कार्य दीपस्तंभासारखे : आ.थोरात

*शिक्षण संस्थेतर्फे जयंती कार्यक्रमात संवाद*

प्रतिनिधी | नाशिक

कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने बाळासाहेब वाघ यांनी पुढे चालविला. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या विचारांचा वारसा त्यांना लाभला. या विचारांतून त्यांनी आयुष्यभर दीपस्तंभासारखे काम केले. शिक्षण, सहकार, जलसंधारण, कृषी अशा विविध क्षेत्रात बाळासाहेब वाघ यांनी मोठे योगदान दिले, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी केले.



के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व सिमॅंच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचा जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (दि. १९) के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानात हा कार्यक्रम झाला. यावेळी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात बोलत होते. यासमयी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माईल व सिमॅंचचे सचिव अजिंक्य वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, डॉ. सुधीर तांबे, दिलीप बनकर, सीमा हिरे, माजी आमदार अनिल कदम, संस्थेचे विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांचे हस्ते प्रमुख मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. राजेश टोपे म्हणाले की, पुढच्या पिढीने बाळासाहेब वाघ यांच्या विचारांचा वारसा चालवला पाहिजे. सूत्रसंचालन स्वाती पवार व प्रा. जागृती निकम यांनी केले तर आभार अजिंक्य वाघ यांनी मानले.

### स्मरणार्थ चार पुरस्कार

प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकात अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न या तिन्ही महाविद्यालयांच्या असोसिएशनच्यावतीने के. बाळासाहेब वाघ यांचे नावाने सर्वोत्तम संस्था, सर्वोत्तम प्राचार्य, सर्वोत्तम शिक्षक व जीवनगौरव पुरस्कार देण्यात येतील, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

### नावाने विद्यापीठ हवे

बाळासाहेब वाघ यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा विचार करता के. के. वाघ शिक्षण संस्थेने बाळासाहेब वाघ यांच्या नावाने विद्यापीठ सुरू करावे, अशी भावना कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केली. तसेच भविष्यातही संस्थेच्या पाठीशी उभा राहील, असा विश्वास व्यक्त केला.

**Divya Marathi, Dated 21-10-2022**

# ऋतुजाची मायक्रोसॉफ्ट कंपनीत निवड



**नाशिक ।** के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर शाखेच्या तिसऱ्या वर्षात शिकणा-या ऋतुजा हुजारे या विद्यार्थिनीची मायक्रोसॉफ्ट या जगप्रसिद्ध कंपनी मध्येद्विमासिक इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. मायक्रोसॉफ्ट स्टुडन्ट एंगेजमेंट- २०२२ मार्फत देशभरातल्या नामांकित विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांसाठी निवड प्रक्रिया पार पडते. इंटर्नशिप दरम्यान ऋतुजला एक लाख पंचावन्न हजार विद्यावेतन मिळणार असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी ऋतुजाचे अभिनंदन केले.

**Deshdoot, Dated 21-10-22**

# अभियांत्रिकीच्या थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश आजपर्यंतच

प्रतिनिधी | नाशिक

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकीच्या प्रवेश अर्जाची प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जासाठी शुक्रवार (दि. २१) पर्यंत ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. तर अंतिम गुणवत्ता यादी दिवाळीनंतर म्हणजेच १ नोव्हेंबरला जाहीर होईल. विशेष म्हणजे, ज्या शाखेमध्ये पॉलिटेक्निक डिप्लोमा पूर्ण केला आहे, त्या शाखेमध्ये किंवा पदवीसाठी शाखा बदलायची असेल तर विद्यार्थ्यांना ती संधीही उपलब्ध आहे. थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पॉलिटेक्निक डिप्लोमाच्या सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण असणे अनिवार्य असते. बारावीनंतर चार वर्षे तर पॉलिटेक्निकनंतर तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

डिप्लोमाच्या अंतिम वर्षाचे निकाल जाहीर झाले असून ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या पदवीसाठी प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांना फॅसिलिटेशन सेंटरद्वारे २१ ऑक्टोबरपर्यंत प्रवेश अर्ज करता येईल. कॅप राउंड प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. दिवाळीनंतर कॅप राउंडची प्रक्रिया होऊन प्रत्यक्ष वर्ग जानेवारी २०२३ मध्ये सुरू होऊ शकतात. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत थेट द्वितिय वर्ष अभियात्रिकी प्रवेश प्रक्रिया आता २१ ऑक्टोबरपर्यंत सुरू असल्याने विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज या मुदतीत करावेत असे कक्षातर्फे कळविण्यात आली आहे.

## प्रवेश प्रक्रिया अशी...

- १० ते २१ ऑक्टोबर : प्रवेश अर्ज सादर करणे.
- २७ ऑक्टोबर : तात्पुरती गुणवत्ता यादी होईल जाहीर.
- २८ ते ३० ऑक्टोबर : यादीवरील तक्रारी दाखल करणे.
- १ नोव्हेंबर : अंतिम गुणवत्ता यादी होईल जाहीर.

**Divya Marathi, Dated 21-10-2022**

# कै. बाळासाहेब वाघ यांचे कार्य दीपस्तंभासारखे : बाळासाहेब थोरात



नाशिक । स्व. बाळासाहेब वाघ यांच्या व्यक्तिमत्वाला कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या विचारांचा वारसा लाभला. या विचारातून त्यांनी आयुष्यभर दीपस्तंभासारखे काम केले. पुरोगामी विचारांची पिढी म्हणून कर्मवीर काकासाहेब वाघ यांना ओळखले जाते. त्याचप्रमाणे बाळासाहेबांना कर्मयोगी ही उपाधी देत त्यांच्या कार्याचा गौरव करावा अशा भावना महाराष्ट्राचे माजी महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केल्या.

के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या जयंती कार्यक्रमा निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानात अडीच हजाराहून अधिक मान्यवरांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, महाराष्ट्र राज्याचे भाजपचे उपाध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माईल व स्पिनॅचचे सचिव अजिंक्य वाघ, खासदार हेमंत गोडसे, माजी खासदार समीर भुजबळ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार दिलीप बनकर, आमदार सीमा हिरे, माजी आमदार अनिल कदम, संस्थेचे विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक वृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्था गीताने करण्यात आली. त्यानंतर मंचावरील मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन केले. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि कृषी व कृषी संलग्न या तिन्ही महाविद्यालयांच्या असोसिएशनच्या वतीने के. बाळासाहेब वाघ यांचे नावे सर्वोत्तम संस्था, सर्वोत्तम प्राचार्य, सर्वोत्तम शिक्षक व जीवनगौरव पुरस्कार यांची घोषणा केली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांचे हस्ते प्रमुख मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

राजेश टोपे म्हणाले की, गेल्या वर्षी बाळासाहेब यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त उपस्थित राहण्याची संधी मिळाली याबद्दल ऋणी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त पुढच्या पिढीने बाळासाहेब वाघ यांच्या विचारांचा वारसा चालवला पाहिजे हीच खरी भावना आदरांजली होईल. सध्या शिक्षणात गुणवत्ता टिकवून ठेवणे मोठे आव्हान आहे. हे आव्हान के. के. वाघ शिक्षण संस्थेने बाळासाहेब वाघ यांच्या मार्गदर्शनाने लिलया पेलले. भाऊ शेवटपर्यंत माणसे जोडत गेले.

बाळासाहेब वाघ यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले काम पाहता के. के. वाघ शिक्षण संस्थेने बाळासाहेब वाघ यांचे नावे विद्यापीठ सुरू करावे अशी भावना कृपाशंकर सिंह यांनी व्यक्त केली. तसेच भविष्यातही संस्थेच्या पाठीशी सदैव उभा राहील असा विश्वास व्यक्त केला. डॉ. राहुल आहेर, अनिल कदम, डॉ. सुधीर तांबे, दिलीप बनकर, सीमा हिरे व माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर यांनी कै. बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते डॉ. शंकरराव मगर लिखित कृषी क्रांतीचे योगिराज व ब.ना. कुंभार गुरुजी लिखित अशुद्ध लेखन शुद्ध कसे करावे या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पवार व प्रा. जागृती निकम यांनी केले तर आभार प्रदर्शन अजिंक्य वाघ यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. यशस्वीतेसाठी संस्थेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.